**प्रेस नोट ०७/०५/२०१९**

**शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर**

**चिखली पोलीस ठाणे बुलढाणा गु.रजि.नं.२६४/२०१९ भादंवि**

**कलम ३६३ मधील पीडीत मुलगी व आरोपी यास ताब्यात दिलेबाबत**

दिनांक ०७/०५/२०१९ रोजी शिवाजीनगर बिट मार्शलचे पो.शि. विजय जगताप हे शिवाजीनगर एस टी स्टँन्ड परिसरमध्ये रात्र गस्त पेट्रोलींग करत असताना शिवाजीनगर एस टी स्टँन्डचे बाहेर एक मुलगा व मुलगी संशयास्पदरित्या फिरत आसताना मिळुन आल्याने त्यांना शिवाजीनगर पोलीस चौकी येथे आणले असलेबाबत सपोनि रणजित भोईटे यांना फोन व्दारे कळविल्यानंतर सपोन भोईटे हे तात्काळ शिवाजीनगर पोलीस चौकी येथे गेले व संशईत रित्या फिरत असताना मिळुन आलेल्या मुलगा व मुलगी यांच्याकडे चौकशी केली असता सदर मुलाने त्याचे नाव अनिल जगन्नाश शेळके वय २५ वर्षे रा. गोद्री ता. चिखली जि बुलढाण असे असल्याचे सांगितले त्यास शिवाजीनगर एस टी स्टँन्ड येथे येणेबाबत विचारले असता त्याने माझ्यासोबत असलेल्या मुलीचे लग्न तिच्या आई वडिलांनी तिचे इच्छेविरुध्द पिंपळगाव देवी जि बुलढाण येथील मुलाशी जमविलेले असल्याने आम्ही दोघे पळुन आलो असल्याचे सांगितले सदर मुलीकडे विचारणा केली असता तिने तिचे वय १७ वर्ष असल्याचे सांगितल्याने व ती अल्पवयीन असल्याने तिचे कुटुंबीयांशी संपर्क साधण्याकरीता मोबाईल क्रमांकाबाबत विचारणा केली असता तिने मोबाईल क्र न सांगितल्याने सपोनि भोईटे जि बुलढाणा येथे फोन करुन ताब्यात घेतलेल मुलीबाबत माहिती विचारली असता तेथे कर्तव्यावर असणारे पोलीस उपनिरीक्षक श्री खाडे यांनी त्याबाबत मुलीचे चुलते नामे विष्णु अश्रुबा पेटुळे रा. गोंद्री ता. चिखली जि बुलढाणा यांनी इसम नामे अनिल जगन्नाथ शेळके वय २५ वर्षे रा. सदर याने मुलीचे अपहरण केल्याबाबत दिलेल्या तक्रारीवरुन चिखली पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नं २६४/२०१९ भादवि कलम ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे सांगितले त्यावेळी सपोनि भोईटे यांनी पोलीस उप निरीक्षक खाडे यांना सदर मुलगी व आरोपी अनिल शेळके हे शिवाजीनगर एस टी स्टँन्ड परिसरामध्ये मिळुन आलेले असुन त्यांना पोलीस ठाणे येथे आणलेले असल्याचे कळविले त्याप्रमाणे चिखली पो स्टे चे पोलीस नाईक शेळके, पो शि गाडेकर, मपोशि मोरे असे सांयकाळी १७.३० वा पोलीस ठाणे येथे हजर झाल्याने ताब्यात घेण्यात आलेली पिडीत अल्पवयीन मुलगी व आरोपी अनिल शेळके यास पुढील कार्यवाही करीता त्यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

वरील नमुद कारवाई ही बाळासाहेब कोपनर वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजीनगर पो स्टे पुणे, बापु शिंदे पोलीस निरीक्षक गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि रणजित भोईटे, पो शि विजय जगताप, पो शि सागर कोंडे, मपोना पुष्पा बुट्टे यांनी केलेली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर**